www.sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १२३ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.३१ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


Scan QR code to visit ... Epaper Portal

Scan QR code to visit ... Epaper Portal

# मानापमानानंतर अखेर वंचितची 'मविआ'मध्ये एंट्री

**मुंबई**–महाराष्ट्रासह देशात लोकसभा निवडणुकीचे वारे वाहत आहेत. ही निवडणूक सत्ताधारी एनडीए विरुद्ध विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीती होणार आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात आज विरोधी बाकावरील महाविकास आघाडीच्या मुंबईत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपासह एनडीए विरोधी रणनीती निश्चित करण्यात आली.

दुसरी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे मविआमध्ये 'वंचित बहुजन आघाडी' या मित्रपक्षाचा अधिकृपणे समावेश करण्यात आला आहे. मविआच्या प्रमुख तीन पक्षाकडून वंचितला पत्र देऊन ही माहिती दिली गेली. दुसरीकडे मात्र वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी मानापमानावर नाराजी व्यक्त केली. परंतु आम्ही भाजप–आरएएएसला पराभूत करण्यासाठी मविआच्या पुढील बैठकीत जाणार आहोत, असे जाहीर केले.वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आमच्या पक्षाचे राज्य उपाध्यक्षांना महाविकास आघाडीच्या बैठकीत योग्य ती वागणूक मिळाली नाही. दुसरी बाब म्हणजे, नाना पटोले यांना महाविकास आघाडीमध्ये तइ– समाविष्ट करण्यासाठी कोणत्याही पत्रावर स्वाक्षरी करण्याचा अधिकार आहे की नाही हे –खउउ ने किंवा काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांना वंचितला सांगितले नाही. परंतु या सर्व प्रकारानंतर देखील आम्ही मविआच्या पुढील बैठकीत सामील होणार आहोत, कारण वंचित बहुजन आघाडीला भाजप आणि आरएसएस विचारांना पराभूत करायचे आहे.बैठकीनंतर संजय राऊत म्हणाले की, सकाळपासून प्रदीर्घ चर्चा झाली आहे. आमच्या महाविकास आघाडीमध्ये सीपीएम, सीपीआय, आप, जनता दल युनायटेड, वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पार्टी या सगळ्यांचा समाविष्ट महाविकास आघाडीत झाला आहे. त्यामुळे आघाडी अधिक मजबूत झालेली आहे. वंचित बहुजन आघाडीत नेते योग्य वागणूक दिली नाही, असा आरोप केला. बैठकीच्या ठिकाणी आल्यानंतर ते व्यवस्थित बसले



होते. प्रत्येक चर्चेत सहभागी झाले होते. त्यामुळे तुमच्यापर्यंत चुकीची माहिती दिली गेली असावी, असे संजय राऊत म्हणाले.आजच्या महाविकास आघाडीच्या बैठकीसाठी मुंबईतील ट्रायडेंड हॉटेलमध्ये वंचित बहुजन आघाडीकडून महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ. धैर्यवर्धन पुंडकर गेले होते. त्यावेळी डॉ. पुंडकर यांनी बैठकीत आपला अजेंडा महाविकास आघाडीसमोर सादर केला. तेव्हा आम्ही चर्चा करून सांगतो असे म्हणून त्यांना १ तास बैठकी बाहेर बसवून ठेवण्यात आले. आतमध्ये चत– च्या तिन्ही पक्षांची (काँगेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना) बैठक झाली.वंचित बहुजन आघाडीकडून आजच्या बैठकीत खालील अजेंडा मांडला गेला. आजच्या बैठकीत मिळालेल्या वागणुकीबाबत डॉ. पुंडकर यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली.मुंबईतील ट्रायडेन्ट हॉटेलमध्ये महाविकास आघाडीची आज बैठक पार पडली. यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) व शिवसेना (ठाकरे गट) हे मविआतील ३ प्रमुख पक्षांचे नेते उपस्थित होते. शिवसेनेकडून या बैठकीला खासदार संजय राऊत व विनायक राऊत तर राष्ट्रवादीकडून जयंत पाटील व जितेंद्र आव्हाड व काँग्रेसकडून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, अशोक चव्हाण व मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांची उपस्थिती होती. या बैठकीला वंचित बहुजन आघाडीच्या वतीने देखील प्रतिनिधी सहभागी झाले होते. जागावाटपासंदर्भात या चर्चा झाली. तसेच वंचितचा मविआत समावेश केला जावा, या ठरावावर चर्चा झाली. यासंदर्भात स्वतः प्रकाश आंबेडकर यांनी मविआ मध्ये समावेश झाल्याची अधिकृत घोषणा केली.महाविकास आघाडीची यापूर्वी २५ जानेवारी रोजी बैठक झाली होती. त्यात सीपीआय व सीपीएम नेत्यांशी चर्चा झाली होती. विशेषतः या बैठकीत प्राथमिक जागावाटप निश्चित झाले होते. संजय राऊत यांनी या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना वंचित व राजू शेट्टी यांना बैठकीला बोलावण्यात आल्याचे सांगितले होते. त्यावरून महाविकास आघाडीने या प्रकरणी छोट्या घटक पक्षांनाही विश्वासात घेतल्याचे स्पष्ट झाले होते.

# त्या आक्षेपार्य पोस्टच्या संदर्भात वरोऱ्यात निघाला भव्य मोर्चा









**वरोरा । प्रतिनिधी**

प्रभू रामचंद्रांच्या बाबत आक्षेपार्य पोस्ट समाज माध्यमावर टाकणाऱ्या व्यक्तीच्या निषेधार्थ ३० जानेवारी रोज मंगळवार ला वरोरा शहरात निषेध मोर्चाचे आंदोलन करण्यात आले होते.

प्रभु श्रीरामाचे अश्लील चित्र पुण्याच्या बंद असलेल्या फेसबुक अकाउंटवर टाकुन ते व्हायरल करण्याचे कृत्य भद्रावती येथील एका समाजकंटकाने केले . सदर रामद्रोहयाचे कृत्य हे हिंदु समाजाच्या भावना दुखावणारे आहे. अशी चित्रे प्रसिध्द करण्यामागे समाज कंटकाचा दृष्टहेतु हा सामाजिक वातावरण व शांतता भंग करण्याचा आहे. तसेच या कृत्यामागे धार्मिक



तेढ निर्माण करून दंगली भडकविण्याचा कुटील हेतु असावा अशी शंका निर्माण होत असल्याचा आरोप आयोजकांच्या वतीने निवेदनातून करण्यात आला. या बाबत भद्रावती पोलीसांनी आरोपीस अटक केली . मात्र हया कृत्या च्या मागे ज्या शक्तींचा हात आहे त्यांची सखोल चौकशी करावी, सदर व्यक्तीवर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करावे आणि हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे आदी मागण्यांचे निवेदन याप्रसंगी तहसीलदार योगेश कोटकर यांना देण्यात आले. गांधी चौकातून निघालेल्या या निषेध मोर्चात विश्व हिंदू परिषद,सकल हिंदू समाज, विविध संघटना आणि राजकीय पक्षांचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी श्रीरामाच्या घोषणांनी परिसर निनादला होता.

# भेजगाव,सिंतळा ग्राम पंचायतीवर प्रशासक राज

**मूल । प्रतिनिधी**

तालुक्यातील राजकीय दृष्ट्या संवेदनशील समजल्या जाणाऱ्या भेजगाव ग्रामपंचायतिचा पंचवार्षिक कार्यकाळ ११ जानेवारी २०२४ ला संपला. मात्र यापूर्वी निवडणूक झाली नसल्याने नवीन सरपंच निवडीसाठी वेळ आहे. सध्या स्थितीत भेजगाव व सिंतळा या ग्रामपंचायतीवर निवडणूक लागून नवीन सरपंच पदाची निवड होईपर्यंत प्रशासक राज असणार आहे.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अध्यादेश–२०२० अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम १५१ मधील पोट कलम (१) मध्ये,खंड (क)मध्ये नंतर जर नैसर्गिक आपत्ती किंवा आणीबाणी किंवा युद्ध किंवा भीती आणीबाणी किंवा प्रशासकीय अडचण किंवा महामारी इत्यादींमुळे राज्य निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार पंचायतीच्या निवडणुका घेणे शक्य नसतील तर राज्य शासनाच्या पंचायतीचा प्रशासक म्हणून योग्य व्यक्तीची नियुक्ती करण्याची तरतूदीनुसार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी २५ जानेवारी ला आदेश काढत भेजगांव ग्रामपंचायत साठी पंचायत समितीचे कृषी अधिकारी किशोर चौधरी तर सिंतळा येथील ग्रामपंचायती करीता आरोग्य विस्तार अधिकारी चंद्रकांत जक्कुलवार यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे.मुल तालुक्यातील भेजगाव, सिंतळा येथील पंचवार्षिक निवडणूक सप्टेंबर २०१८ रोजी पार पडली ११ जानेवारी २०१९ ला सरपंचांनी पदभार स्वीकारला होता.भेजगांव ग्रामपंचायत ११ सदस्य असून यावेळी जनतेतून सरपंच निवडायचे असल्याने भेजागाव ग्रामपंचायतीवर काँग्रेसचे अखिल गांगरेड्डिवार सरपंच तर नऊ सदस्य भाजपाचे निवडून आल्याने उपसरपंच पदी भाजपाचे बबन लेनगुरे यांनी सत्ता उपभोगली.तर सिंतळा येथे भाजपाचे विलास चापडे यांनी सरपंच पदी विराजमान झाले.निवडणूक विभागाच्या वतीने दोन्ही ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचना सुरू असून वार्डनिहाय आरक्षण अजूनही पडले नसल्याने सध्या तरी ग्रामपंचायत निवडणुका कधी होतील हे निश्चित सांगता येत नाही.त्यामुळे प्रशासकाची हाती सत्ता असणार आहे.



## भद्रावती येथे राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या पुतळ्याला माल्यार्पण

भद्रावती : राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त भद्रावती येथे त्यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करण्यात आली. यावेळी राष्ट्रपिता नगर विकास मंच चे अध्यक्ष धनंजय गुंडावार, सचिव धर्मेंद्र हवेलीकर, सदस्य रवी पवार, विजय भोयर,प्रकाश दास इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.

# ३०० पेक्षा जास्त कलाकार उलगडणार महाकाव्य रामायणातील प्रसंग

## ३१ जानेवारीला गेट वे ऑफ इंडिया येथे महाकाव्य रामायणातील प्रसंगांचे सादरीकरण

**मुंबई । प्रतिनिधी**

देशभरासह अवघ्या विश्वातील नागरिकांच्या मनाला भावणाऱ्या महाकाव्य रामायणातील विविध प्रसंगांचे प्रयोगात्मक कलेतून सादरीकरण असलेला आणि गीत, नृत्य, नाट्य, गायन, वादन यामधून रामायण महाकाव्यातील प्रसंग जागविणारा कार्यक्रम बुधवार, दिनांक ३१ जानेवारी रोजी गेट वे ऑफ इंडिया येथे सायंकाळी सात वाजता सादर केला जाणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमात दूरचित्रवाहिनीवरील लोकप्रिय ठरलेल्या रामायण मालिकेतील काही कलाकारांचा सत्कारही करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.गेट वे ऑफ इंडिया येथे बुधवारी सायंकाळी ७ ते ९.३० या कालावधीत हा कार्यक्रम होणार आहे. महाकाव्य रामायण या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून रसिकांना पुन्हा एकदा ग.दि. माडगूळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून आणि स्व. सुधीर फडके (बाबूजी) यांच्या आवाजातून अजरामर झालेल्या गीतरामायणातील विविध प्रसंगांतील गीतांचे सादरीकरण पुन्हा एकदा नव्या कलाकारांच्या नृत्य, नाट्य, आणि वादनातून अनुभवता येणार असल्याचे मंत्री ना.मुनगंटीवार यांनी सांगितले.या महाकाव्य रामायण सांस्कृतिक कार्यक्रमात श्रीरामांच्या भूमिकेत अभिनेता ललित प्रभाकर, सीतामाईच्या भूमिकेत अभिनेत्री मृण्मयी देशपांडे आणि लक्ष्मणाच्या भूमिकेत शुभंकर परांजपे हे सादरीकरण करणार आहेत. या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी विनामूल्य प्रवेश असून त्यासाठीच्या सन्मानिका मुंबईतील विविध नाट्यगृहे, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी यांच्यासह सांस्कृतिक कार्य संचालनालय तसेच मंत्रालयातील सांस्कृतिक कार्य विभाग येथे उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

## पदमापूर येथे स्काऊट गाईड जिल्हा मेळाव्याचे आयोजन

# स्काऊट गाईडच्या माध्यमातून तरुणांचा शारीरिक, मानसिक,बौद्धिक,विकास होता–आ.किशोर जोरगेवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आपण इंटरनेट आणि सोशल मिडीयाच्या युगात जगत असतांना जिवनाच्या मुल तत्वांकडून दुरावत जात आहोत. अशात स्काउटिंग गाइडिंग ही एक विशिष्ट तरुण व्यक्तिमत्व विकास संस्था युवकांच्या जिवनाला दिशा देण्याचे काम करत आहे. एकंदर विचार केला असता स्काउट्स गाईड्सच्या माध्यमातून तरुणांचा शारीरिक,मानसिक,बौद्धिक,सामाजिक आणि आध्यात्मिक विकास होत असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

चंद्रपूर भारत स्काऊट गाईड,जिल्हा कार्यालय,बहुजन हिताय फाउंडेशन चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पदमापूर येथे स्काऊट गाईड जिल्हा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. स्काउटचे माजी मुख्यालय आयुक्त प्रा. सुर्यकांत खनके,शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे अध्यक्ष रामपाल सिंग,माता महाकाली महोत्सव समितीचे सचिव अजय जयस्वाल,दिलीप वावरे,विजयराव टोंगे,रुपा ताकसांडे,पद्मापूर च्या सरपंचा उज्वला तापरे,संजय यादव,रुद्र नारायण तिवारी,शांताराम उईके,चंद्रकांत भगत,यशवंत हजारे,रंजाना किन्नाके आदी मान्यवरांची उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि,आजचा युवक मैदानी खेळापासून दूर जात आहे. त्यामुळे विद्यार्थी जीवनापासून त्यांच्यातील कला गुणांचा शोध घेत त्यांना आवड असलेल्या खेळांसाठी त्यांना प्रोत्साहित केल्या गेले पाहिजे. विद्यार्थांनी स्काऊट गाईड मध्ये मोठया उत्साहाने सहभाग घेतला पाहिजे. यात जीवन जगण्याची पध्दतीचे शिक्षण दिल्या जाते ते भविष्यात विद्यार्थांना उपयुक्त ठरेल असे ते यावेळी म्हणाले.स्काऊट गाईड ही चळवळ ३ ते २५ वयोगटातील मुले,मुली,तरुण पुरुष आणि महिलांसाठी मानसशास्त्रावर आधारित प्रशिक्षण आणि क्रियाकलाप देते. त्यांच्या सर्वांगीण विकासात मदत करते आणि त्यांना स्थानिक,राष्ट्रीय,जबाबदार सदस्य बनण्यासाठी तयार करते. देशाचे एकनिष्ठ नागरिक राहून स्थानिक,राष्ट्रीय आणि जगभरात एकोपा,परस्पर आदर आणि सहकार्याचा प्रचार करण्याचे काम यातुन केल्या जात असल्याचे ते यावेळी म्हणाले. असे आयोजन आपण नियमीत केले पाहिजे हे समाज हिताचे कार्य असुन यासाठी लोकप्रतिनीधी म्हणून मी सदैव आपल्या पाठीशी असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला स्काउड गाईडच्या सदस्यांची हजारोच्या संख्येने उपस्थिती होती.



# प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता सगर यांना मोतीबिंदू झालाय का. ?

## निकृष्ट रस्ता तपासणी न करताच म्हणे गुणवत्तापूर्ण आणि समाधानकारक–डॉ.गणेश ढवळे

**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत बहुतांश रस्ते महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीडचे अधिकारी कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो)अ.ज्ञ.सगर यांनी संबंधित कंत्राटदार यांच्याशी संगनमतानेच निकृष्ट दर्जाचे केले असुन रस्ते ग्रामस्थांसाठी की गुत्तेदार पोसण्यासाठी असा प्रश्न ग्रामस्थांना पडला असुन सामाजिक कार्यकर्ते तथा विविध संघटनांनी रास्ता रोको आदि आंदोलने करून चौकशी करण्याची मागणी केल्यानंतर रस्त्याची वाट लावणाऱ्या कंत्राटदारांची पाठराखण करत करण्यात आलेले रस्ते हे अंदाज पत्रकानुसार, गुणवत्तापूर्ण आणि समाधानकारक झाले असुन तक्रारदार यांच्या तक्रारींमध्ये तथ्य दिसुन येत असल्याचे लेखी कळवण्याचा कोडगेपणा केल्याचे दिसून येत आहे. त्या मुळे कार्यकारी अभियंता(प्रमंग्रासयो)महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड यांना मोतीबिंदू झालाय का?असा सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. बीड तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड यांच्या मार्फत पालवण चौक ते लिंबागणेश प्राजिमा ३१ जवळ ते आहेर धानोरा, वरवटी–भाळवणी, बेलेश्वर चौक ते लिंबागणेश एकुण २७ किलोमीटर लांबीच्या अंदाजे किंमत १२ कोटी ७५ लाख रुपये रस्त्याचे काम सुरूवातीपासूनच अत्यंत निकृष्ट दर्जाचे व गौण खनिज चोरी करुन ठेकेदार एम.टी.मस्के कन्स्ट्रक्शन बीड आणि महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड अधिकारी यांनी संगनमताने खोटे अहवाल जोडत शासनाची दिशाभूल केली आहे. संबधित प्रकरणात वारंवार तक्रार निवेदनानंतर थातुरमातुर दुरुस्ती म्हणजेच ठिगळं लावण्याचे काम करण्यात येते.

पालवण ते लिंबागणेश मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्यावर मोठमोठे भगदाड पडलेले असुन तातडीने भुजविण्यात यावेत, तसेच निकृष्ट रस्ता प्रकरणी संबंधित कंत्राटदार आणि आधिका–यांवर कर्तव्यात कसूर केल्याबद्दल कारवाई करण्यात यावी अशी



तक्रार सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे यांनी केल्यानंतर कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड यांनी संबंधित प्रकरणी कार्यकारी अभियंता मुख्यमंत्री ग्रामसडक योजना बीड यांना उचित कार्यवाही करण्याबाबत पत्रव्यवहार केला असता कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो)महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था बीड यांनी सदर रस्त्याचे काम एम.टी.मस्के कन्स्ट्रक्शन कंपनी बीड यांच्या मार्फत पुर्ण झाले असुन सदर रस्त्याचे काम अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार झालेले असुन सदरील कामावर वेळोवेळी वरीष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक व राज्य गुणवत्ता निरीक्षक तपासणी केली असुन काम समाधानकारक असल्याचे शेरे दिलेले आहेत. त्यामुळे तक्रारी मध्ये तथ्य नसल्याचा जावई शोध लावला आहे त्यामुळे सगर यांना मोतीबिंदू झालाय का? असा सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ग्रामस्थांना दळणवळणाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी मुख्यमंत्री/पंतप्रधान ग्रामसडक योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त झाला मात्र थातुरमातुर रस्त्यांची कामे करून रस्ते ग्रामस्थांसाठी की गुत्तेदार पोसण्यासाठी हा खरा प्रश्न असुन लोकप्रतिनिधी यांचे कार्यकर्ते अथवा पदाधिकारी यांचेच जवळचे नातेवाईक गुत्तेदार असुन निकृष्ट कामाची लोकप्रतिनिधींना पुराव्यानिशी तक्रारी केल्यानंतर देखील लोकप्रतिनिधी जाणिवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसत आहेत असे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सांगितले.

## बोर्डा ग्रामसभेत महिलांनी केल्या मागण्या

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत बोर्डा येथे २६ जानेवारी निमित्त महिला ग्रामसभेच्या आयोजन करण्यात आलेले होते. याप्रसंगी गावातील महिलांनी मोठ्या संख्येने सभेत उपस्थित दर्शवली. या ग्रामसभेत बोर्डा ग्रामपंचायतच्या सरपंच पल्लवी तोडासे, उपसरपंच दीपक खनके, ग्रामसेवक गणेश मार्गेनवार, माजी सरपंच संगीता मेश्राम, ग्रामपंचायत सदस्य व बचत गटातील महिला उपस्थित होत्या.



या महिला सभेत ग्रासरुट लिडरशिप कार्यक्रमाचे फेलो आचल सोयाम व महिलांनी मिळून महिलांच्या घरटॅक्स पावतीवर नाव आहे परंतु घरासमोर पती–पत्नी दोघांचेही नाव असलेली नेम प्लेट संपूर्ण गावांमध्ये लावून देण्यात यावे. गावामध्ये शंभर टक्के विवाह नोंदणी प्रमाणपत्र देण्यात यावे जेणेकरून महिलांना आधार कार्ड काढण्यास, पतीच्या मृत्यूपच्यात मालकी हक्क मिळवण्यासाठी समस्या येतात, शेतीच्या सातबारावर नाव चढवण्यासाठी महिलांना समस्या येऊ नये. गावातील घटस्फोटीत व विधवा परीतक्ता महिलासाठी तिळगूळ व हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेण्यात यावा आणि तो कार्यक्रम ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या बोर्डा, वलनी, घंटाचौकी व चेक बोर्डा या प्रत्येक गावामध्ये दरवर्षी घेण्यात यावा. तसेच ग्रामसभेबाबत गावांमध्ये नोटिस लावण्यात यावे. जेणेकरून लोकांना ग्रामसभेची माहिती होईल व महिलांची उपस्थिती वाढेल इत्यादी मागण्या महिला ग्रामसभेमध्ये करण्यात आल्या. ही ग्रामसभा उत्स्फूर्तपणे महिलांच्या उपस्थितीत यशस्वी झाली.

## सावळी येथे मराठा आरक्षण विजयी मिरवणूक

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत तालुक्यातील मौ. सावळी येथे मराठा आरक्षण विजयी मिरवणूक आयोजित करण्यात आली होती मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला अखेर यश आले असून आरक्षणा बाबत शासनाने २७ जानेवारी रोजी आध्यादेश काढला आहे या निर्णयाचा जल्लोष आणि स्वागत ठिक ठिकाणी करण्यात आले असून याच अनुषंगाने मानवत तालु क्यातील सावळी, सह सावरगाव खु. पाळोदी, आंबेगाव, या ठिकाणी या निर्णयाचा सर्वत्र जल्लोष करुन स्वागत करण्यात आले यावेळी सकल मराठा समाज बांधवाच्या वतीने मराठा आरक्षण विजयी मिरवणूक काढण्यात आली विजयाचा गुलालाची



उधळण करत अतिशबाजी करून हा आनंदोत्सव साजरा करण्यात आला तसेच गावागावातुन मुंबई येथील मराठा आरक्षण लढ्यात सहभागी झालेल्या योध्याचे औक्षण करुन त्याचा सत्कार गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आला व मराठा आरक्षण विजयी मिरवणुक काढण्यात आली यावेळी विजयी मिरवणुकीत सकल मराठा समाज बांधवांनी मोठया संख्येने उत्स्फूर्त पने सहभागी होत हा आनंदोत्सव साजरा केला.

## प्रामाणिक कामामुळेच पंतप्रधानांच्या स्वागताची मिळाली संधी–सिद्धेश्वर गाडे

**सांगोला । प्रतिनिधी**

घरची पार्श्वभूमीचा कोणताही राजकीय संबंध नाही, घरची परिस्थिती तशी बेताचीच परंतु दिलेले काम निस्वार्थीपणे व मन लावून केले तर त्याचे फळ निश्चितच भेटते हे सिद्ध करुन दाखवले सांगोल्याचे रहिवासी असलेल्या व सोलापूर जिल्हा भाजपचे कार्यालयीन प्रमुख सिद्धेश्वर गाडे या तरुणाने. सिद्धेश्वर गाडे यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विमानतळावर स्वागत करण्याची संधी मिळाली. भाजपच्या पक्षीय प्रामाणिक कामकाजामुळेच पंतप्रधानांच्या स्वागताची संधी मिळाल्याचे सिद्धेश्वर गाडी यांनी सांगितले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता विमानतळावर त्यांचे स्वागत करण्याची संधी खिलारवाडी (ता सांगोला) येथील रहिवासी असलेले सिद्धेश्वर गाडे यांना मिळाली. सिद्धेश्वर गाडे हे तसे उच्च शिक्षीत असून भाजपचे कार्यकर्ते आहेत. पक्षीय काम करीत असताना त्यांना भाजपचे सोलापूर जिल्ह्याचे कार्यालयीन प्रमुख पदावर काम करण्याची संधी मिळाली. या पदावर काम करीत संधीची सोने करून आपली कार्यकुशलता त्यांनी सिद्ध केली आहे. संपूर्ण जिल्ह्याचे कार्यालयाचा कारभार यांनी अतिशय प्रामाणिकपणे करीत आहेत, पक्षाच्या विविध योजना, वरिष्ठांमार्फत आलेली प्रत्येक काम, प्रत्येक कार्यक्रम, नियोजनपूर्वक व सर्व समावेशक केले आहे. जिल्ह्यातील भाजपच्या नेत्यांसह राज्यातील अनेक वरिष्ठ नेत्यांबरोबर चांगले संबंध ठेवले आहेत. या संबंधाचाच फायदा त्यांना होत आहे. सोलापूर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी कार्यक्रमासाठी आले असता त्यांना विमानतळावर यांचे स्वागत करण्याची संधी त्यांनी मिळाली. तसे पाहिले असता सिद्धेश्वर गाडे यांना कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नाही. सामान्य कुटुंबातील असलेले गाडे हे सध्या फक्त आपल्या कार्यावर, प्रामाणिकपणा बरोबरच जिद्दीवर सर्वांशी लाडके व्यक्तिमत्व बनले आहे. या त्यांच्या स्वभाव गुणामुळेच त्यांना पंतप्रधानांचे स्वागत करण्याची संधी मिळाली. पंतप्रधानाचे स्वागत करणे माझ्या जीवनातील अतुलनीय क्षण असून हा क्षण मी आयुष्यात कधीही विसरणार नसल्याचे सिद्धेश्वर गाडे यांनी सांगितले.

**माझ्या जीवनातील अनमोल क्षण अनुभवण्यास मिळाला**

मी संघटनात्मक काम करीत असताना भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी व दुसरे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार–सावंत, सरचिटणीस शशिकांत चव्हाण या वरिष्ठ नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता त्यांनी मला विमानतळावर स्वागत करण्याची संधी दिली. हा क्षण माझ्या जीवनातील अनमोल असून पंतप्रधानाचे स्वागत करणे मी माझे भाग्य समजतो – सिद्धेश्वर गाडे, सोलापूर जिल्हा कार्यालयीन प्रमुख, भाजप.

# उदगीर नगरपरिषद कार्यालया अंतर्गत घंटागाडी लोकार्पण आणि प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**उदगीर । । प्रतिनिधी**

उदगीर नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागांमध्ये नव्याने सहा घंटागाडया दाखल झाल्या असून या घंटागाड्यांचा लोकार्पण मा.ना.संजयजी बनसोडे, मंत्री युवक कल्याण व बंदरे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी अनेक मान्यवर, माजी नगरसेवक, नगरपरिषदेचे अधिकारी कर्मचारी, स्वच्छता मित्र यादी उपस्थित होते. यावेळी मा.मंत्री महोदय यांनी शहर स्वच्छतेच्या कामा बाबत समाधान व्यक्त करत स्वच्छता कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक, विभाग प्रमुख, मुख्यधिकारी यांचे कौतुक केले.



दिनांक २६ जानेवारी २०२४ भारतीय प्रजासत्ताक दिन उदगीर नगरपरिषद कार्यालय अंतर्गत उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. नगरपरिषद कार्यालय अंतर्गत सकाळी सात वाजता उपमुख्याधिकारी सतीश बिलापट्टे यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी पुतळ्यास पुष्पहार अर्पण व ध्वजारोहण, सात वाजून वीस मिनिटांनी आधार शहरी बेघर निवारा केंद्र येथे शहर अभियान व्यवस्थापक महारुद्र गालट यांच्या हस्ते ध्वजारोहण, सात वाजून तीस मिनिटांनी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी डॉ. रमण यनाडले यांच्या हस्ते, सात वाजून पन्नास मिनिटांनी पाणीपुरवठा केंद्र या ठिकाणी अभियंता सुनील कटके यांच्या हस्ते, आठ वाजून दहा मिनिटांनी अग्निशमन विभाग प्रमुख विशाल अल्टे यांच्या हस्ते अग्निशमन केंद्र या ठिकाणी ध्वजारोहण तर आठ वाजता मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांच्या शुभहस्ते हुतात्मा स्मारकासपुष्प चक्र अर्पण करून ध्वजारोहण संपन्न झाला, नगरपरिषद प्रशासकीय मुख्य ध्वजारोहण आठ वाजून तीस मिनटांनी प्रशासक सुशांत शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. प्रजासत्ताक दिनानिमित्त शहरातील सर्व थोर महापुरुषांचे स्मारक यामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. झाकीर हुसेन, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, महात्मा बसवेश्वर पुतळा रेल्वे स्टेशन, हुतात्मा स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, वसंतराव नाईक चौक, महात्मा बसवेश्वर नगरपरिषद संकुल इ.ठिकाणी विभाग प्रमुख अधिकारी कर्मचारी यांच्या हस्ते यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.नगरपरिषद कार्यालय सदैव शहर स्वच्छता, पाणीपुरवठा, पथदिवे या अनुषंगिक बाबी सदैव कार्य तत्पर असते त्यासोबतच शहरातील अनेक नागरिक संस्था यादेखील या कार्यास आपल्या योगदान देत असतात त्यांच्या कार्याचा गौरव करणे हे आपले कर्तव्य असून या भूमिकेतून मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांच्या संकल्पनेतून सन २०२३–२४ मध्ये विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्था, नागरी यांचा देखील यावेळी सन्मान करण्यात आला. सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या रोटी कपडा बँक हा उपक्रम चालवणाऱ्या सलाद अल्पसंख्यांक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेस, पर्यावरण क्षेत्रामध्ये भरीव योगदान उदगीर शहर व परिसर हिरवेगार करण्यासाठी पुढाकार घेणारे रमेश नागप्पा अंबरखाने, आरोग्य श्रेत्रात डॉ. उमाकांत जाधव, कोविड काळामध्ये प्रथम प्लाजमा डोनेट करणारे रमेश झिल्ले सन्मानचिन्ह प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले, तसेच उदगीर नगरपरिषदे अंतर्गत सर्वच विभाग प्रमुख व कर्मचारी उत्कृष्टरित्या काम करत असतात व आपल्या कार्यालयाचा नावलौकिक समाजामध्ये वाढवत असतात त्यांच्या कार्याचे कौतुक व्होवे त्यांचा आदर्श इतर अधिकारी कर्मचारी यांनी घ्यावा या उद्देशाने सन २०२३–२४ मध्ये अति उत्कृष्ट कार्य करणारे यात प्रशासकीय विभाग, नागरिकांच्या समस्या निराकरण करणे, सर्व अधिकारी कर्मचारी समन्वय ठेवणे, वरिष्ठ कार्यालयास विहित वेळेत अहवाल आदर करणे, विविध शासकीय अभियान राबवणे इ, कार्या बाबत प्रशासकीय अधिकारी विरेंद्र उळागड्डे, प्रशासकीय अधिकारी यांना उत्कृष्ठ अधिकारी प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले. तर शहर स्वच्छता मध्ये उत्कृष्ठ कार्य करणारे प्रभारी स्वच्छता निरीक्षक शेख सिकंदर, अमित सुतार, विनोद रंगवाळा, उमाकांत गंडारे, यांच्यासोबत प्रत्येक स्वच्छता विभागामध्ये उत्कृष्टपणे काम करणारे कर्मचारी तथा सफाई मित्र स्वच्छता विभाग अ मधून योगेश श्रीरंग गायकवाड, ब मधून अनिल दशरथ कांबळे, क मधून गुणाबाई सुदाम सूर्यवंशी, तर ड विभगा मधून सत्यभामा प्रभू सूर्यवंशी या सर्वांचा प्रशासक सुशांत शिंदे मुख्याधिकारी सुंदर बोंदर, तहसीलदार रामेश्वर गोरे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.तसेच उपस्थित सर्वांना राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत शपथ देण्यात आली. यावेळी सर्व अधिकारी कर्मचारी सर्व माजी नगरसेवक, नागरिक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सह्याद्रीचा राखणदार



# आता जेवढा रिचार्ज तेवढीच मिळेल वीज

# वीज ग्राहकांना मार्च महिन्यापासून स्मार्ट मीटर

**सोलापूर :** लघुदाब घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर ग्राहकांकडे स्मार्ट प्रीपेड वीजमीटर मोफत बसविण्याचे नियोजन 'महावितरण'कडून पूर्णत्वास गेले आहे. पश्चिम महाराष्ट्रात सिंगल व थ्रीफेजच्या एकूण ६८ लाख ३९ हजार ७५२ वीजग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर बसविण्यात येणार आहेत. त्यात सोलापूर जिल्ह्यातील सात लाख १६ हजार ६४६ ग्राहकांचा समावेश आहे. यासोबतच 'महावितरण'च्या वीज वितरणाचा हिशेब अचूक ठेवण्यासाठी जिल्ह्यात २२ हजार ९३३ वितरण रोहित्रे, वीजवाहिन्यांना स्मार्ट मीटर लावण्यात येणार आहेत.विजेच्या व नवीन वीजजोडण्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. दर्जेदार वीजपुरवठ्यासाठी तसेच वितरण यंत्रणेचे बळकटीकरण करण्यासाठी 'सुधारित वितरण क्षेत्र' योजना राबविण्यात येणार आहे. योजनेतून लघुदाब वीजग्राहकांकडे प्रीपेड स्मार्ट मीटर लावण्यात येणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आधुनिक तंत्रज्ञानाचे व विजेच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा ग्राहकांना अधिकार देणारे स्मार्ट प्रीपेड मीटर बसविण्यात येत आहेत.मार्च महिन्यापासून पश्चिम महाराष्ट्रात मीटर बसविण्याचे काम सुरू होईल. सध्या अस्तित्वात असलेल्या पारंपरिक वीजमीटरच्या प्रणालीत ६८ लाख ४० हजार ग्राहकांकडे जावून दरमहा मीटरचे फोटो रीडिंग घेणे, त्यानुसार वीजबिल तयार करून वितरण करणे या प्रक्रियेत काही दिवसांचा कालावधी लागतो. घराला कुलूप असल्याने रीडिंग न घेता येणे, चुकीचे असल्यास दुरुस्ती करणे, मीटर नादुरुस्त होणे तसेच वीजबिलांचा भरणा न होणे, थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित करणे, अशा समस्या उद्भवतात. त्यामुळे स्मार्ट मीटरिंगची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे विजेवरील खर्च नियंत्रणात राहील. पाहिजे तेवढाच वीजवापर करता येईल आणि बिलिंगच्या तक्रारी संपुष्टात येतील, असा विश्वास पुणे प्रादेशिक संचालक अंकुश नाळे यांनी व्यक्त केला आहे.



## मंत्रिमंडळाला विश्वासात न घेता मराठा आरक्षणाची अधिसूचना

# सरकारमधील श्रेयवादाच्या लढाईत ओबीसी समाज उद्ध्वस्त-विजय वडेट्टीवार

**मुंबई–**मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबतची अधिसूचना काढण्यात आली. ही अधिसूचना काढण्याबाबतचा निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत झाला नाही. मंत्रीमंडळाला विश्वासात न घेता मराठा समाजाचा नेता म्हणून मिरवण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी ही मराठा आरक्षणाबाबतची अधिसूचना काढली आहे. या अधिसूचनेमुळे ओबीसी समाजावर अन्याय झाला असून या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी येत्या २० फेब्रुवारीला संभाजीनगर येथे ओबीसींच्या विराट सभेचे आयोजन केले आहे. ही सभा ओबीसींच्या संविधानिक हक्काच्या रक्षणासाठी आहे. आरक्षण देण्यावरून सरकारमध्ये श्रेयवादाची लढाई सुरू असून या लढाईमुळे ओबीसी समाजाला उद्ध्वस्त करण्याचे पाप सरकारकडून केले जात आहे. असा हल्लाबोल करत आमचा मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोधी नाही, असे विधानसभेचे



विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.मुंबई येथे आज ओबीसी समाजाच्या संघटनांची बैठक विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या शासकीय निवासस्थानी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत वडेट्टीवार बोलत होते.वडेट्टीवार म्हणाले की, गृहमंत्री म्हणतात भाजप आहे तोपर्यंत ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही. केंद्रीय मंत्री राणे म्हणतात स्वाभिमानी मराठा समाज कुणबी समाजामध्ये समाविष्ट होऊन आरक्षण घेणार नाही. मुख्यमंत्री म्हणतात की, आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घेण्यात येतील. गृहमंत्री म्हणतात सरसकट गुन्हे मागे घेता येणार नाहीत. यावरून मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांमधील विसंवाद दिसून येतो. हे सरकारच ओबीसी विरूद्ध मराठा हा वाद निर्माण करून दोन्ही समाजामध्ये संशयाचे वातावरण निर्माण करत आहे.सगेसोयरे शब्दामुळे ओबीसी आरक्षणात कोणाचाही शिरकाव होऊ शकतो. त्यामुळे ज्यांच्या नोंदी आहेत त्यांना आरक्षण देण्यास आमची हरकत नाही. सध्याच्या अधिसूचनेत अटी शिथिल केल्यामुळे प्रमाणपत्र कोणालाही मिळू शकते हे चुकीचे आहे. सरकार एकाच समाजाचे हित पाहत आहे. सरकारची ही अडेलतट्टूपणाची भूमीका ओबीसी समाजाला खड्ड्यात घालणारी आहे. अशा शब्दात श्री. वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका करत ओबीसी समाजातील बांधवांनी १६ फेब्रुवारीपर्यंत अधिसूनेवर आक्षेप नोंदवावेत, असे आवाहन त्यांनी केले.संभाजीनगर येथे २० फेब्रुवारीला ओबीसींची विराट सभा होणार आहे. या सभेपूर्वी येत्या ५ तारखेपासून राज्यातील आमच्या शक्तीस्थळाना भेट देवून आम्ही स्फूर्ती घेणार आहोत. याची सुरूवात चैत्यभूमीपासून होणार आहे. मंत्री छगन भुजबळ यांच्या भूमिकेला समर्थन असल्याचेही श्री. वडेट्टीवार यांनी यावेळी स्पष्ट केले. त्याचबरोबर सध्या महाराष्ट्रात आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या सर्व्हेवर विरोधी पक्षनेत्यांनी आक्षेप नोंदविला.

# लोकसभेसाठी भाजप लागले कामाला

**मुंबई–**महाराष्ट्राच्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर एक मोठी बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार येत्या आठवड्यात दिल्लीला जाणार आहेत. या आठवड्यात दिल्लीत अतिशय महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली आहे, अशी माहिती सुत्रांकडून दिली जात आहे.आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत तयारीला सुरुवात झाली आहे. भाजपकडून जोरदार तयारी सुरु आहे. याच तयारीचा भाग म्हणून दिल्लीत भाजपप्रणित एनडीएची दिल्लीत अतिशय महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठीचे महाराष्ट्र सरकारमधील हे तीनही सर्वात प्रमुख नेते दिल्लीला जाणार आहेत.येत्या आठवड्यात दिल्लीत आयोजित करण्यात येत असलेल्या एनडीएच्या बैठकीत लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपाबाबत चर्चा होणार आहे. या बैठकीत जागावाटपाबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून दिली जात आहे. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत ही बैठक पार पडणार आहे. विशेष म्हणजे बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यासह एनडीएमधील घटक पक्षांचे प्रमुख नेतेदेखील या बैठकीत सहभागी होणार



आहेत.देशभरातील बहुतेक विरोधी पक्ष हे एकत्र येताना दिसत आहेत. या विरोधकांच्या आघाडीचं इंडिया आघाडी आघाडी असं नाव त्यांनीच ठरवलं आहे. महाराष्ट्रातील शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वातील गट आणि काँग्रेस हे पक्ष इंडिया आघाडीतील घटक पक्ष आहेत. याशिवाय वंचित बहुजन आघाडी आणि इतर लहान पक्षांसोबतही विरोधी पक्षांचं बोलणं सुरु असल्याची माहिती मिळत आहे.देशात इंडिया आघाडीचा जन्म झाला असला तरी या आघाडीला महाराष्ट्रात महाविकास आघाडी अशी ख्याती आहे. या महाविकास आघाडीची राज्यात अडीच वर्ष सत्तादेखील होती. दरम्यानच्या काळात महाविकास आघाडीतील दोन घटक पक्षांमध्ये मोठी फूट पडली आणि आघाडीची सत्ता गेली. आता परिस्थिती वेगळी आहे. पण तरीदेखील सत्ताधाऱ्यांसाठी त्यांचं कडवं आव्हान असणार आहे.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या निमित्त बोरीतील १८ मराठी भाषा शिकविणाऱ्या शिक्षकांचा जैन वाचनालयाने केला गौरव



**कौसडी । प्रतिनिधी**

१४ जानेवारी ते २८ जानेवारी दरम्यान सर्वत्र मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विविध उपक्रम राबविले जात आहेत. बोरीच्या कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आज मराठी भाषा शिकविणाऱ्या विविध शाळांतील १८ शिक्षकांचा गौरव करण्यात आला. वाचनालयाचे अध्यक्ष सौ.मिना जैन ,उपाध्यक्ष पवन ओझा, सचिव बालाप्रसाद सोमानी तसेच सूर्यप्रकाश सोनी ,दीपक राजुरकर, सौ. कांता सोमानी यांनी हा उपक्रम राबविण्याचे ठरवले होते .

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार शाळेतील शिक्षक अविरतपणे करीत आहेत. अशा शिक्षकांना अधिक चालना मिळावी यासाठी १८ शिक्षकांचा आज सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. त्यामध्ये जिल्हा परिषद केंद्रीय कन्या शाळेच्या सौ ज्योती उलेमाले, सौ नीता आव्हाड, सौ ज्योती स्वामी ,सौ मीरा आव्हाड, जिल्हा परिषद हायस्कूलच्या सौ संगीता कदम ,संतोष चिद्रवार, शिरीष बोरोले ,शकुंतलाबाई कदम बोर्डीकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे दिगंबर काठोळे ,सौ मंगल क्षीरसागर, साईकृपा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे दीपक क-हाळे, प्रसाद चव्हाण तर ज्ञानोपासक विद्यालयाच्यामुख्याध्यापिका सौ. दुर्गा देशमुख,बालाजी काळे, डी.सी .बुरकुले, राजेश ढोबळे, शिवाजी खोकले ,माणिक ढोले, पंढरीनाथ लांडगे यांचा समावेश आहे. कार्यक्रमास एम.डी.माटे, मुख्याध्यापक पी.बी.रांजवन तसेच अभिजीत अंभुरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल नेमीनाथ जैन यांनी केले. जैन वाचनालयाने राबवलेल्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे सर्व शिक्षकांनी कौतुक केले.

# प्रभाग क्रमांक २ मधिल सिंदखाना परिसरातील पाणी पूरवठा सूरळीत करा–भारतीय जनता पार्टीची मागणी

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत नगर परिषदेच्या प्रभाग क्रमांक २ या प्रभागातील सिंदखाना व मांगवाडा या परिसरात नळाला पाणी नियमित येत नसल्यामूळे मानवत नगर परिषदेच्या पाणिपूरवठा विभागाने सूरळती पणे पाणि सोडविण्यात यावेत तसेच कुर्हाडे गल्ली येथील नालीला उतार नसल्यामुळे नालीचे पाणि तूंबून मच्छरांचा प्रार्दूभाव वाढत आहे त्यामूळे त्यामूळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता वर्तविल्या जात असून न.पा प्रशासनाने नागरि समस्या सोडव्याव्यात अशी मागणी एका निवेदनाद्वारे भाजपाचे अमोल कूर्हाडे,नागनाथ कूर्हाडे, रवि वाघमारे, उमेश घांडगे, प्रविण मगर, विकास देशमाने , वामन चव्हाण, सोपान सिसोदे, राम



कच्छवे, अनिल घाटून यांनी केली आहे.मानवत नगर परिषदेच्या प्रभाग क्र. २ मधील सिंदखाना व मांगवाडा या परिसरातील नळांना सध्या पाणी येत नाही. या कारणा मुळे या प्रभागातील नागरीकांना पिण्याच्या पाण्यासाठी तारेवरची कसरत करण्याची पाळी येत असून या प्रभागातील व परिसरात नागरिकांना सूरळीत व व्यवस्थीत दाबाने पाणी पुरवठा करण्यात यावा. अशी मागणी मानवत नगर परिषदेच्या मूख्याधिकारी यांच्या कडे भारतीय जनता पार्टीच्या वतीने एका निवेदना द्वारे करण्यात आली.मानवत शहरातील कुर्हाडे गल्ली या भागातील सांड पाणी वाहून नेणार्या नालीला उतार नसल्यामुळे या भागातील नाल्या तूंबलेल्या आहेत त्या मूळे घाणसांड पाणी साचत असून त्यावर मच्छरांचा प्रार्दूभाव वाढत त्यामूळे या भागातील परिस्थिती मुळे पाणी जशास तसे साचुन या नालीतील सांडपाणी, घाणपाणी मुळे मच्छरांचा प्रादुर्भाव वाढत आहे त्या मुळे या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.त्यामूळे मानवत नगर परिषदेच्या मूख्याधिकारी यांनी भागात प्रत्येक्ष पाहणी करून सामान्य नागरिकांच्या नागरी समस्या सोडव्याव्यात अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या वतीने एका निवेदना द्वारे करण्यात आली.

# मुंबईचा डबेवाला मराठा आंदोलकांची भूक भागवणार

**मुंबई–**मराठा आरक्षणाचा मुद्दा जोर धरू लागला असून मनोज जरांगे पाटील मुंबईच्या वाटेवर आहेत. या आंदोलनादरम्यान अनेकांना मुंबईत आंदोलकांचे जेवणाचे काय होणार? हा मोठा मुद्दा समोर आहे. कारण या आंदोलनात लाखोच्या संख्येने मराठा बांधव सहभागी झाले आहेत. याबाबत मुंबईच्या डबेवाल्यांनी मोठं पाऊल उचललं आहे. मराठा आरक्षणाला हातभार लावण्यासाठी मुंबईचे डबेवाले अतिरिक्त सेवा पुरवणार आहेत. 'डबेवाला रोटी बँक'च्या साहाय्याने आंदोलकांना जेवणाची सोय करण्यात येणार आहे.यावर बोलतांना कैलास शिंदे म्हणाले की, २६ जानेवारीपासून माझ्यासारखे अनेक डबेवाले कामगार दोन डबे घेऊन घराबाहेर पडणार आहोत. एक डबा स्वतःसाठी आणि एक डबा भुकेल्या मराठा आंदोलकांसाठी. जिथे मराठा आंदोलक दिसणार त्याला डबा खाऊ घालायचा, असे शिंदे म्हणाले.कैलास शिंदे शेकडो डबेवाल्यांसोबत अतिरिक्त डब्याची सोय करणार आहेत. त्यासोबतच डबेवाला रोटी बँकच्या गाड्या २४ तास अन्न पुरवण्याची सेवा देणार आहेत. पुढे ते म्हणाले की, यामागचा आमचा उद्देश मात्र एकच आहे. कोणताही मराठा आंदोलक हा उपाशीपोटी राहू नये.मुंबईतील डबेवाला कामगार हा मराठा आहे. 'काम ही ईश्वर पुजा' आहे, असे मानून तो मुंबईत काम करतो. आर्थिकदृष्ट्या डबेवाला जरी गरीब असली तरी तो मराठा आरक्षणाला हातभार लावण्यासाठी पुढे आला आहे. आरक्षणाचा मोर्चा मुंबईत आल्यानंतर या मोर्चाला आपलाही मदतीचा काही हातभार, खारीचा वाटा का होईना पण त्यात असला पाहीजे असे या डबेवाल्यांचे म्हणणे आहे.

# मानवत पो.स्टेचे सपोनि प्रभाकर कापुरे यांची प्रभारी पोलिस निरिक्षक म्हणून चारठाणा येथे नियुक्ती

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत पोलीस स्टेशन येथे स.पो.नि. प्रभाकर कापुरे यांचे सलग दोन वर्षे मानवत येथे सेवा केल्या नंतर त्यांची प्रभारी पोलीस निरीक्षक म्हणून चारठाणा पोलीस स्टेशन येथे नियुक्ती झाली आहे.पोलिस प्रशासनाच्या वतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जिल्हा पोलीस प्रशासनाने बदल्या केल्या आहेत. २०२४ लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदल्याचे आदेश देण्यात आले आहेत.या बदली प्रकरणात मानवत पो.स्टेचे सपोनि प्रभाकर कापुरे यांचे नाव आहे मानवत येथून प्रभारी पोलिस निरिक्षक म्हणून चारठाणा पोलीस स्टेशन येथे नियुक्ती झाली. त्यानिमित्त त्यांना मानवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक दंतुलवार यांच्या अध्यक्षतेखाली निरोप समारंभाचा कार्यक्रम घेण्यात आला. दिनांक २५ जानेवारी रोजी मानवत पो.स्टे मध्ये सायंकाळी सहाच्या वाजेच्या दरम्यान हा निरोप समारंभ कार्यक्रम घेण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रभाकर कापुरे हे दोन वर्षांपूर्वी पुणे येथून नुकतेच मानवत येथे मराठवाडा विभागात पहिल्याच वेळेस त्यांची नियुक्ती झाली होती. मानवत पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक दंतुलवार यांच्या अध्यक्षतेखाली सह.पोलिस निरीक्षक प्रभाकर कापुरे यांच्या निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला.यावेळी पोलीस निरीक्षक दीपक दंतुलवार, यांच्यासह सह.पोलिस निरीक्षक आनंद बनसोडे, उपनिरीक्षक किशन पंतगे, अशोक ताटे, समाज सेवक विधितज्ञ गणेश मोरे , दशरथ शिंदे पाटील, इरफान बागवान , पोलीस कर्मचारी, होमगार्ड यांची या वेळी उपस्थिती होती. या प्रसंगी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक किशोर गावंडे यांनी केले तर या प्रसंगी उपस्थितांनी त्यांच्यावर फुलांचा वर्षाव केला. या प्रसंगी कर्मचारी भावुक झाले होते एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून प्रभाकर कापूरे यांची ओळख मानवत परिसरात होती.




सह्याद्रीचा राखणदार



# एक दृष्टे शिक्षण तज्ञ प्राचार्य-वसंतराव दोंतुलवार

ध्येयवेड्या व कर्तव्य परायण व्यक्तीच्या कार्याला मर्यादा राहत नाहीत. काळ, वेळ, परिस्थिती व कोणीही व्यक्ती त्याच्या सत्कार्याला अडवू शकत नाही. मुळातच ती व्यक्ती सर्व शक्य अशक्य बाबींवर आरुढ होऊन आपले सत्कार्य करण्यासाठी जीवाचे रान करते. वेळ, काळ व परिस्थितीच्या बंधनासही ती व्यक्ती जुमानत नाही. हाती घेतलेले कार्य ती व्यक्ती ठाम निश्चयाने पूर्णत्वास नेते. आपले कार्य सिद्ध झाल्याशिवाय ते स्वस्त बसत नाहीत. हे मात्र नक्कीच. अशी ध्येयवेडी माणसेच स्वकर्तृत्वाने काळाच्या पडद्यावर आपली भूमिका बजावून कायम स्मरणात राहतात. अशा कर्तुत्ववान व्यक्तिंमध्ये गुरुवर्य प्राचार्य स्व. वसंतरावजी दोंतुलवार यांचेही कार्य उल्लेखनीय आहे. किंबहुना जिल्ह्याच्या शैक्षणिक प्रगतीचा मागोवा घेतल्यास त्यांच्या कार्याचा उल्लेख झाल्याशिवाय राहणार नाही.

अशा कर्तुत्ववान व्यक्तिमत्वाचे धनी असलेल्या प्राचार्य स्व. वसंतरावजी दोंतुलवार यांचा जन्म स्वातंत्र्यपूर्व काळात श्री लच्छयाजी व सौ. रमाबाई या दाम्पत्याच्या पोटी दि. ८ ऑगस्ट १९४५ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यात असलेल्या देवलमारी या छोट्याशा अभावग्रस्त अशा खेड्यात झाला. हा परिसर म्हणजे दर्या, खोऱ्या व घनदाट जंगलाने व्यापलेला होता. सर्वसाधारण कुटुंबात जन्मलेल्या वसंतरावांना एकूण पाच भावंडे होती या सर्व भावंडांचे बालपण निसर्गाच्या सहवासात खेळण्या बागडण्यात गेले. त्यांचे प्राथमिक शिक्षण जन्मगावीच पूर्ण झाले. त्यांच्यात असलेली जिद्दी, चिकाटी व अभ्यासुवृत्तीला ओळखून त्यांच्या वडिलांनी स्वगावात पुढील शिक्षणाची सोय नसल्यामुळे अहेरी येथील धर्मराव कृषी विद्यालयात दाखल केले. नंतर त्यांनी हायस्कूलचे शिक्षण चंद्रपुरातील सिटी हायस्कूल मधून उत्तम गुणांनी पूर्ण केले. त्यांच्यातील गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून घरच्यांनी त्यांना पुढील शिक्षणासाठी नागपूर येथे पाठविले. परंतु तेथे काही काळ गेल्यानंतर प्राकृतिक कारणास्तव त्यांना नागपूर सोडून चंद्रपुरात शिक्षणासाठी परतावे लागले. येथील जनता महाविद्यालयातून त्यांनी आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले.बी.ए. पदवी प्राप्त केल्यानंतर घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे गडचिरोली येथील वसंत विद्यालयात शिक्षक पदावर ते रुजू झाले. त्या काळातही आपले पुढील शिक्षण न थांबवता त्यांनी ते शिक्षण पूर्ण केले. येथील चार वर्षाच्या नोकरीच्या काळातही ते अल्पावधीतच विद्यार्थी प्रिय झाले. त्यांचे इंग्रजी विषयावर उत्तम प्रभुत्व होते. पुढे ते



१९७२ मध्ये बल्लारपुरातील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. आपल्या अध्यापन व संवाद कौशल्यामुळे येथेही ते विद्यार्थी प्रिय झाले. येथे बराच काळ ज्ञानदानाचे कार्य केल्यानंतर माजी आमदार व शिक्षण महर्षी स्व. प्रभाकररावजी मामुलकर यांनी सुरू केलेल्या श्री शिवाजी महाविद्यालय, राजुरा येथे प्राचार्य म्हणून ते रुजू झाले. येथेही त्यांनी आपल्या कार्याप्रती एकनिष्ठ राहून आपले कर्तव्य पार पाडले. त्यांच्यातील एकनिष्ठता, प्रामाणिकपणा, शिस्त व उत्तम प्रशासनामूळे ते अल्पकाळातच व्यवस्थापनाच्या विश्वासास पात्र ठरले. विद्यार्थी, कर्मचाऱ्यांशी आपुलकीचा भाव, विद्यार्थी व महाविद्यालय हिताचे कार्य केल्यामुळे येथेही ते चांगलेच नावारूपास आले. येथील प्राचार्य पदाचा काळ म्हणजे त्यांच्या आयुष्यातील सुवर्णकाळच म्हणावा लागेल.एक शिक्षक ते प्राचार्य असा प्रवास करत त्यांनी शिक्षण क्षेत्रात बरेच अनुभव घेतले. त्यातील बारकावे ओळखले. त्यांच्यातील जिज्ञासू शिक्षक व शिक्षण तज्ञ त्यांना स्वस्त बसू देत नव्हता. काहीतरी उल्लेखनीय कार्य करण्याचे त्यांनी ठरविले. आजही अनेक ठिकाणी उच्च शिक्षणाची सोय नाही. तेथे उच्च शैक्षणिक सुविधा आपण उपलब्ध करून दिले पाहिजे असे त्यांना मनोमन वाटत होते. हे विचार त्यांनी स्व. मामुलकर यांच्याकडे बोलून दाखवले. मामुलकर साहेबांच्या मार्गदर्शनात पुढील शैक्षणिक कार्य करण्यास ते सिद्ध झाले. यातूनच एका शिक्षण संस्थेची सुरुवात झाली.आपल्या विधायक कार्याची सुरुवात करण्यासाठी त्यांनी १९९८ ला चिंतामणी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. या संस्थेअंतर्गत आदिवासी बहुल नक्षलग्रस्त असलेल्या पोंभूर्णा, विसापूर व घुग्घूस या ठिकाणी शाळा महाविद्यालयाची सुरुवात करून गरजूंपर्यंत ज्ञानगंगा पोहोचविण्याचे कार्य सुरू केले. हे विधायक कार्य सुरू असताना नियतीला ते पहावले नाही. आपले कार्य व स्वप्न पूर्ण होण्याआधीच प्राचार्य, वसंतरावजी दोंतुलवारांचे ३० जानेवारी २००० ला दुःखद निधन झाले.त्यांच्या कार्याची प्रेरणा घेत त्यांचे अपूर्ण कार्य पूर्ण करण्यासाठी त्यांच्या अर्धांगिनी प्रा. शुभांगीताई दोंतुलवार व त्यांचे सुपुत्र श्री स्वप्नीलजी दोंतुलवार यांनी संस्थेच्या कार्याचा विस्तार करत. गोंडपिपरी व बल्लारपूर सारख्या ठिकाणी महाविद्यालय सुरू करून संस्थेला व शाळा महाविद्यालयांना प्रगतीपथावर नेत गरजूंना शैक्षणिक सेवा देत जिल्ह्यच्या शैक्षणिक विकासात हातभार लावत आहेत. एवढेच नाही तर या संस्थेला जिल्ह्यातील एक अग्रगण्य शिक्षण संस्था म्हणून नावारूपास आणले आहे.आज ही संस्था रौप्य महोत्सवी वर्षात आहे. अशा या थोर शिक्षण तज्ञाच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या शैक्षणिक कार्यास व स्मृतीस विनम्र अभिवादन

**.डॉ. माधव कांडणगिरे, घुग्घूस**

## स्काऊट्स आणि गाईड्सचा ४२ व्या जिल्हा मेळाव्याचे मानवत येथे आयोजन

### जिल्हा मेळाव्या मध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे शिक्षण विभागाचे आव्हान




**मानवत । प्रतिनिधी**

परभणी भारत स्काऊट्स आणि गाईड्स जिल्हा कार्यालय तथा शिक्षण विभाग प्राथमिक व माध्यमिक जिल्हा परिषद परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने २८ ते ३१ जानेवारी रोजी दरम्यान स्काऊट्स आणि गाईड्सचा ४२ व्या जिल्हा मेळाव्याचे आयोजन मानवत येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रत्नापूर इंडियन गॅस एजन्सी जायकवाडी वसाहत पाथरी रोड रत्नापूर या ठिकाणी केले आहे. दरम्यान या मेळाव्यामध्ये प्रदर्शन, शोभा यात्रा, स्पर्धा, बिन भांडयाचा स्वयंपाक, मुख्य शेकोटी कार्यक्रम, संचलन स्पर्धा, तंबू उभारणी स्पर्धा, प्रथमोपचार स्पर्धा, मानवी मनोरे स्पर्धा, तंबू निरीक्षक स्पर्धा, बँड स्पर्धा, राष्ट्रीय एकात्मता खेळ, आदी कार्यक्रमाची मोठी रेलचेल आसणार आहे. या मेळाव्याचे उदघाट्न २९ जानेवारी रोजी सकाळी ११ : ०० वाजता मा. जिल्हाधिकारी श्री. रघुनाथजी गावडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि. प. परभणी श्री. सचिन कवठे यांच्या उपस्थितीत होणार आहे. तर जिल्हा मेळावा समारोप श्री. प्रताप काळे अप्पर जिल्हाधिकारी परभणी, श्री. शैलेश लाहोटी उपविभागीय अधिकारी पाथरी यांच्या उपस्थितीत ३१ जानेवारी रोजी सकाळी १०:०० वाजता होणार आहे. या स्काऊट्स आणि गाईड्स मेळाव्यास जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषदेचा प्राथमिक, माध्यमिक, खाजगी अनुदानित, विना अनुदानित, सर्व माध्यमाच्या शाळेच्या सर्व स्काऊट्स आणि गाईड्स युनिट, स्काऊट्स मास्टर, गाईड कॅप्टन यांनी जास्तीत जास्त संख्येने जिल्हा मेळाव्या मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन श्री. गणेश शिंदे, शिक्षणा धिकारी प्राथमिक, श्री. माधव सलगर शिक्षणाधिकारी माध्यमिक श्री. मनोज भातलवंडे वेतन अधीक्षक माध्यमिक, श्री. गजानन वाघमारे उपशिक्षणा धिकारी प्राथमिक, श्री. डी. आर. रणमाळे गटशिक्षणाधिकारी मानवत श्री. शिरीष लोहट केंद्रप्रमुख मानवत आणि परभणी भारत स्काऊट्स आणि गाईड्स जिल्हा संस्थेचा शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## आज सुजाता बुद्ध विहार येथे आंतर रष्ट्रीय भिक्खू संघाची धम्म देशना

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी शहरातील सर्व बौद्ध उपासक उपसिका याना कळविण्यात येते की सुजाता नगर वासीयांच्या वतीने दिनांक ३०.०१.२०२४ वार मंगळवार रोजी सायंकाळी ५.०० वाजता धम्म देशनेच्या कार्यक्रमाचे आयोजन सुजाता बुद्ध विहार, सुजाता नगर येथे केले आहे या कार्यक्रमाला दक्षिण कोरिया येथील नामवंत भिक्खू आदरणीय भिक्खू हाँग जीन सु व भिक्खू डॉ.ली ची रॅन व्हाईस, चान्सलर कोरियन बुद्धिस्ट विद्यापीठ, तसेच पूज्य भिक्खू करुणानंद महाथेरो दिल्ली संघनायक अखिल भारतीय भिक्खू संघ बुद्ध गया , पू. भदंत डॉ.उपगुप्तजी महाथेरो कार्यध्यक्ष अखिल भारतीय भिक्खू संघ , भन्ते मुदितानंद थेरो हे उपस्थित राहणार आहेत

शहरातील सर्व बौद्ध उपासक उपसिका यांनी कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून धम्म देशनेचा लाभ घ्यावा असे आवाहन सुजाता बुद्ध विहार समिती तर्फे करण्यात आले आहे.




## चाचा नेहरु बालमहोत्सवास जल्लोषात सूरवात

### जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते उद्घाटन

**परभणी । प्रतिनिधी**

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयामार्फत दि. २९ ते ३१ जानेवारी दरम्यान होत असलेल्या बालमहोत्सवाचे उद्घाटन आज जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते झाले.यावेळी सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी श्री. सामाले, अपर कोषागार अधिकारी नीलकंठ पाचंगे, लेखाधिकारी श्रीमती शिंदे, बाल कल्याण समिती अध्यक्ष ड. कातनेश्वरकर, बाल न्याय मंडळाचे सदस्य श्रीमती नेरलीकर, श्री. पुराणिक, शासकीय बालगृह अधीक्षक गोविंद अंधारे, अनिल कांदे, जिल्हा संरक्षण अधिकारी श्री. नागरे, परिविक्षा अधिकारी श्रीमती तांदळे, श्रीमती मनतकर, बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड लाईन, वन स्टॉप सेंटरचे कर्मचारी व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

हा बालमहोत्सव २९ ते ३१ जानेवारी दरम्यान सुरू राहणार असून दि. २९ रोजी रनिंग, कबड्डी, दोरीवरच्या उड्या, लांब उडी, लिंबू चमचा या सारख्या ८ मैदानी स्पर्धा संपन्न झाल्या असून या मध्ये प्रथम, द्वितीया व तृतीय असे क्रमांक काढण्यात आले आहेत. दि. ३० रोजी बुद्धिबळ, कॅरम, वक्तृत्व, रांगोळी, यासारखे इनडोअर गेम तर दि. ३१ रोजी गीतगायन, नृत्य हे संस्कृतीक कार्यक्रम व



समारोप होणार आहे. यासाठी जिल्ह्यातील जवळपास १ हजार ५०० विद्यार्थी सहभागी झाले असल्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कैलास तिडके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याने गाजलेले गडकिल्ले ठरणार जागतिक वारसा

# ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारात सांस्कृतिक विभागा कडून केंद्र सरकारकडे पाठवलेला प्रस्ताव युनेस्कोकडे सादर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे साक्षीदार ठरलेले महाराष्ट्रातील ११ व तमिळनाडू मधील १ असे १२ गडकिल्ले युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावित झाले आहे. राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांनी पाठविलेला प्रस्ताव केंद्र सरकारने स्वीकारला असून युनेस्कोकडे यासंदर्भात शिफारस केली आहे. 'मराठा लष्करी रणभूमी परिसर' म्हणून ओळख असलेल्या या १२ किल्ल्यांना युनेस्कोकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावात स्थान देण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ३५०व्या वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भातील प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविला होता. त्याचवेळी देशभरातील विविध राज्यांमधून केंद्र सरकारकडे प्रस्ताव आले होते. मात्र ना. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर केंद्र सरकारकडून महाराष्ट्राचा प्रस्ताव युनेस्कोकडे पाठविण्यात आला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील जिंजी अशा १२ गडकिल्ल्यांना नामांकन देऊन जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्याची शिफारस करण्यात आली आहे. यामध्ये किल्ले रायगड, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, खांदेरी, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग या महाराष्ट्रातील ११ किल्ल्यांचा समावेश आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे रणझुंजार कर्तृत्व आणि त्यांच्या शौर्याचे साक्षीदार ठरलेले हे सर्व किल्ले २०२४-२५ या वर्षासाठी जागतिक वारसा स्थळाच्या यादीत येण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. युनेस्कोच्या वतीने सांस्कृतिक (कल्चरल) आणि नैसर्गिक (नॅचरल) अशा दोन कॅटेगरीमध्ये जागतिक वारसा स्थळांची यादी जाहीर केली जाते. यात महाराष्ट्रातील ११ किल्ल्यांना



सांस्कृतिक निकषात समाविष्ट करण्याची शिफारस केंद्र सरकारने केली आहे. वैशिष्ट्यपूर्ण व अपवादात्मक सांस्कृतिक परंपरांची साक्ष देणाऱ्या वास्तूंचा या गटात समावेश केला जातो. यासोबतच मानवी शौर्याचा इतिहास सांगणाऱ्या या किल्ल्यांचे आर्किटेक्चर, इमारतीचे बांधकाम आणि त्यांची तांत्रिक बाजू देखील यामध्ये ग्राह्य धरली जाते. २०२१ मध्ये युनेस्कोने 'मराठा लष्करी रणभूमी परिसर' हा संभाव्य जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट केला होता. त्यानंतर आता भारतातील ४२ जागतिक वारसा स्थळांमध्ये युनेस्कोने मराठा लष्करी रणभूमी परिसरातील १२ किल्ल्यांचा समावेश करावा, असा प्रस्ताव केंद्र सरकारने युनेस्कोकडे सादर केला आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या अफलातून कार्यशैलीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. त्यांनी घेतलेल्या अनेक ऐतिहासिक निर्णयांमुळे ऐतिसाहिक वारसा आणि परंपरेचे जतन करण्याच्या दृष्टीने सरकारने पाऊल टाकले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे ३५०वे वर्ष साजरे करताना सांस्कृतिक कार्यक्रमांसह ऐतिहासिक परंपरेचे जतन करण्याच्या दृष्टीने देखील त्यांनी पुढाकार घेतला.महाराजांनी ज्या वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला ती वाघनखे ब्रिटनच्या संग्रहालयातून भारतात आणण्याची जिद्द त्यांनी बाळगली. सातत्याने पाठपुरावा करून ब्रिटन सरकारसोबत त्यांनी सामंजस्य करार देखील केला. लवकरच ही वाघनखे दर्शनासाठी भारतात दाखल होणार आहेत. यासोबतच जम्मू-काश्मीर मधील कुपवाडा येथे मराठा इन्फन्ट्री सैन्य दलाच्या सहकार्याने 'आम्ही पुणेकर' या संस्थेमार्फत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाकिस्तानच्या दिशेने तलवार धरलेल्या पुतळ्याचे देखील काही दिवसांपूर्वी अनावरण झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या श्रीशैलममध्ये तपश्चर्या केली, तिथे महाराजांचे एक छोटे मंदिर होते. सरकारने तिथे भव्यदिव्य मंदिर उभे केले. २९ जुलै १९५३ नंतर पहिल्यांदा अफजलखानाच्या कबरीचे अतिक्रमण सरकारने हटवले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .